श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-७, अंक-३ | मार्च-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## ब्रिटिश वैद्यकीय पथकाद्वारे डेरवण रुग्णालयात महाशस्त्रक्रिया शिबिर

प्रतिवर्षाप्रमाणे भ.क.ल. वालावलकर रुग्णालय रोगनिदान व संशोधन संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण येथे इंग्लंडनिवासी भूलशास्त्रतज्ज्ञ डॉ. संजय देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली दि. २७ जानेवारी २०१९ ते दि. ०२ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत महाशस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले.

नेहमीप्रमाणेच या वर्षीही या महाशिबिरासाठी ४० हून अधिक डॉक्टर्स, परिचारिका, पॅरामेडिकल व इतर शास्त्रांचे तज्ज्ञ आले होते. शिबिराची सुरुवात दिनांक २७.०१.२०१८ या दिवशी शिबिरासाठी इंग्लंडमधून आलेल्या सर्व डॉक्टरांच्या सहर्ष स्वागताने झाली. स्वागत समारंभानंतर भूलशास्त्रातील डिफीकल्ट इन्ट्युबेशन (Dificult intubation) याबाबत नवीन ज्ञान व यातील विशेष खुब्या सर्वांना समजाव्यात यासाठी सी.एम.इ. आणि एक कार्यशाळाही आयोजित करण्यात आली होती. यासाठी खेड, लांजा, राजापूर, रत्नागिरी, कडवई, चिपळूण व डेरवण हॉस्पिटलमधील एकूण ७५ डॉक्टरांनी सहभाग घेतला होता. त्यानंतर 'मस्क्युलो स्केलेटल सोनोग्राफी' (Musculo Skeletal sonography) म्हणजेच सांधे व स्नायूंच्या आजाराचे सोनोग्राफीने निदान करणारी मार्गदर्शक कार्यशाळा व सी.एम.इ. चे आयोजन करण्यात आले होते. या सी.एम.इ. व कार्यशाळेचा लाभ सांगली, पुणे, राजापूर, ठाणे, कराड, संगमेश्वर, चिपळूण रत्नागिरी व डेरवण येथील ३५ हून अधिक डॉक्टरांनी घेतला. या झालेल्या दोनही सी.एम.इ. व कार्यशाळांसाठी इंग्लंडहून आलेले डॉ. लान्स कोप, डॉ. रिचर्ड कूपर, डॉ. डी. सिक्सस्मिथ, डॉ. जाईन रिचर्डसन; पुणे येथून आलेले डॉ. अमित खरात व डॉ. संजय देसाई हे रेडिओलॉजी तज्ज्ञ; डॉ. संजय देशपांडे, डॉ. पिटर टायसम, डॉ. रिबेका पार्कर, डॉ. नूर ल्युबीस, डॉ. किरण अहमद व डेरेक जॉन्सन या सर्व भूलतज्ज्ञांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले.

'रॉयल कॉलेज ऑफ एडिनबर्ग', इंग्लंड या विख्यात वैद्यकीय महाविद्यालयाच्या साहाय्याने वालावलकर रुग्णालयात 'बेसिक सर्जिकल स्किल' हा कोर्स दोन टप्प्यात वर्षातून दोन वेळा घेतला जातो. ग्रामीण भागात काम करणाऱ्या सर्जन्सना या कोर्समध्ये शस्त्रक्रियेसंबंधी प्राथमिक शिक्षण दिले जाते. या कोर्सचे हे दुसरे वर्ष असून आता भारतातील हे 'बी. एस. एस.'चे शिक्षण देणारे मान्यताप्राप्त केंद्र झाले आहे. डॉ. नंदन कानविंदे, डॉ. पॉल फिशर, डॉ. इयान वॉलेस व डॉ. सुनील नाडकर्णी यांच्या सहभागामुळे व प्रत्यक्ष मार्गदर्शनामुळे या कोर्सची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच आहे. या कोर्ससाठी केवळ भारतातूनच नव्हे तर परदेशातूनही अनेक वैद्यकीय व्यावसायिक सहभागी झाले होते.




*ब्रिटिश वैद्यकीय पथकासमवेत मुख्य कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर*




*ॲनेस्थेशिया सी. एम. इ. - सहभागी डॉक्टरांसमवेत*
*वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील*

या शस्त्रक्रिया सप्ताहाच्या कालावधीत ब्रिटिश वैद्यकीय पथकाने येथील परिचारिका, डॉक्टर्स्, टेक्निशियन्स व वैद्यकीय सेवेत कार्यरत असलेल्या इतर कर्मचाऱ्यांना तातडिक सेवा विभाग, इन्फेक्शन कंट्रोल, रुग्णालयात उपलब्ध असलेली अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे अशा अनेक वैद्यकीय बाबींविषयी अचूक मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामुळे आणि दिलेल्या माहितीमुळे सर्वांच्या ज्ञानात भर पडली. या ज्ञानाचा लाभ भविष्यात सर्वांना निश्चितच होईल.

परदेशातून आलेले हे डॉक्टर्स रुग्णालयाचे काम जवळपासच्या ज्या खेड्यात चालते तेथील शाळा, अंगणवाडी व बचत गटाना भेटी देतात, त्यांच्याकडून त्यांच्या प्रकल्पांची माहिती घेतात. अडचणी समजून घेतात. रुग्णालयात होणाऱ्या सामुदायिक डोहाळेजेवण, सासू-सून मेळावा व अर्धवार्षिक वाढदिवस व इतर सोहळ्यात आवडीने व उत्सुकतेने भाग घेऊन हे सर्व करण्यामागील रुग्णालयाची भूमिका समजून घेतात.

या शस्त्रक्रिया सप्ताहाच्या कालावधीत ब्रिटिश वैद्यकीय पथक व रुग्णालयात कार्यरत असलेले डॉक्टर यांनी जनरल सर्जरी ५५, युरोलॉजी २९, प्लॅस्टिक सर्जरी ७, लहान मुलांच्या ६, ऑर्थोपिडिक ३३, मोतीबिंदू ११२ व स्त्रियांच्या ११ अशा एकूण २५३ यशस्वी शस्त्रक्रिया केल्या.

दि. १.२.२०१९ या दिवशी सायंकाळी रुग्णालयाच्या मल्टीपर्पज हॉलमध्ये या शिबिरासाठी इंग्लंडहून आलेल्या सर्वांना निरोप देण्यात आला. श्रीगणेश वंदन व श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराजांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

''गेल्या १४ वर्षांपासून डॉ. संजय देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली हे महाशस्त्रक्रिया शिबिर आयोजित केले जाते. हे येणारे सर्व विशेषज्ञ इंग्लंडहून येथे येऊन या दुर्गम भागातील रुग्णांना वैद्यकीय सेवा देत आहेत. त्यांच्या या बहुमूल्य रुग्णसेवेबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. हे इंग्लंडचे सर्व डॉक्टर व आपण वालावलकर रुग्णालयात कार्यरत असलेले सर्व कर्मचारी यांचे एक मोठे कुटुंब झाले आहे यात शंकाच नाही. असेच शिबिर पुढील वर्षीही होईल हे निश्चितच. आम्ही सर्वजण आपल्या आगमनाची आतुरतेने वाट पाहू.'' असे मनोगत डॉ. सुवर्णा पाटील यांनी या शिबिराची पूर्ण माहिती देताना व्यक्त केले.



*रुग्णालयातील परिचारिकांसाठी ब्रिटिश टिम सदस्यांकडून कार्यशाळा*

सत्कारानंतर आपले मनोगत व्यक्त करताना या शिबिरासाठी येणाऱ्या ब्रिटिश वैद्यकीय तज्ज्ञांचे प्रमुख डॉ. संजय देशपांडे यांनी शिबिरासंदर्भात समाधान व्यक्त करून संस्थेची झालेली वाढ व नवीन सुरू झालेल्या व होणाऱ्या उपक्रमांबद्दल आनंद व्यक्त करून पुढील वर्षीही शिबिरासाठी येण्याचे आमंत्रण स्विकारले असल्याचे आवर्जून सांगितले.



*रेडिऑलॉजी सी. एम. इ.- सहभागी डॉक्टरांसमवेत डॉ. नेताजी पाटील*

''शिबिरासाठी भारतात येणे ही एक पर्वणी असून अतिशय आनंदाची बाब आहे. शिबिराचे संयोजनही अतिशय उत्तम झाले आहे.'' असे विचार डॉ. विश भट्टाचार्य यानी व्यक्त केले. शिबिरात आलेल्या एकूण चांगल्या अनुभवांबाबत ब्रिटिश वैद्यकीय पथकातील अनेकांनी आपली मनोगते व्यक्त केली.



*बेसिक सर्जिकल स्किल कोर्स - डॉ. इएन वॅलेस यांचे सखोल मार्गदर्शन*

या शिबिरात ब्रिटिश वैद्यकीय पथकासोबत काम करणाऱ्या येथील परिचारिका आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की महाशस्त्रक्रिया शिबिरामुळे व या सर्व डॉक्टर व इतरांकडून आम्हाला बरेच काही शिकता आले. या सर्वांच्या गेल्या काही दिवसातील सहवासात रुग्णांच्या व्याधीसंबंधी जे ज्ञान व मार्गदर्शन आम्हाला मिळाले ते सर्व आमच्या पुढील आयुष्यात अतिशय उपयुक्त ठरणार आहे असा ठाम विश्वास आम्हाला वाटतो.

या शिबिरात विशेष सहकार्य व सहभाग लाभलेले डॉ. नंदन कानविंदे, डॉ. पॉल फिशर, डॉ. इयान वॉलेस यांचाही ब्रिटिश वैद्यकीय पथकासमवेत संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, अस्थिशल्य विशारद डॉ. सुनील नाडकर्णी व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालचे प्राचार्य डॉ. विजय डोंबले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



*बेसिक सर्जिकल स्किल कोर्स - डॉ. नंदन कानविंदे आणि सहभागी डॉक्टर्स - प्रशिक्षणाच्या अद्ययावत सोयी*

# कॅन्सर पूर्वतपासणीसाठी डॉ. अरुण कुरकुरे फंडाची डेरवण रुग्णालय येथे सुरुवात




*डॉ. सुवर्णा पाटील आपले स्वागतपर भाषण करताना*

प्रतिवर्षी जागतिक कॅन्सरदिन ४ फेब्रुवारी या दिवशी सर्वत्र साजरा होतो. या कॅन्सरदिनाचे औचित्य साधून दि. १७.०२.२०१९ या दिवशी भ.क.ल. वालावलकर रुग्णालय रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण येथे 'स्वर्गीय डॉ. अरुण कुरकुरे कॅन्सर फंडा'ची सुरवात झाली. या फंडाचा उद्घाटन सोहळा या फंडाच्या अध्यक्षा डॉ. पूर्णा कुरकुरे, इंडियन कॅन्सर सोसायटीच्या सल्लागार श्रीमती उषा थोरात व डॉ. श्रीपाद बाणावली यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा झाला. दीप प्रज्वलन व गणेश वंदना झाल्यानंतर रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

रुग्णालयात कॅन्सर सेंटर सुरू झाल्यानंतर आलेल्या विविध अनुभवांचे कथन त्यानी आपल्या मनोगतात केले. ''डॉ. कात्यायनी दिनशॉ, डॉ. राजन बडवे व डॉ. श्रीपाद बाणावली यांच्या अथक परिश्रमाने व प्रयत्नाने हे कॅन्सर सेंटर सुरू झाले. रुग्णालयाने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गाव अन् गाव पिंजून काढून कॅन्सरचे रुग्ण शोधले. त्यांच्यावर योग्य ते उपचार, जरूर तर शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी व मार्गदर्शन करून कॅन्सरबाबत जागृती केली. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषदांच्या शाळेतील विद्यार्थ्यांची दातांची तपासणी केली. त्याना दात घासण्यासाठी टूथ ब्रश व पेस्ट दिल्या गेल्या. आज हा प्रत्येक विद्यार्थी पेस्ट व ब्रशने दात घासतो.

आज २० वर्षांनंतर या दुर्गम भागातील लोक आपणहून शरीरावर उठलेल्या गाठीची तपासणी करतात व कॅन्सर निदान करून घेतात.

प्रथमपासूनच रुग्णालयाचे ध्येय रोगमुक्त समाज हे आहे. त्यानुसारच स्थापनेपासून रुग्णालयाची वाटचाल सुरू आहे. या ग्रामीण भागातील कॅन्सर झालेल्या रुग्णांची; या रोगाची तपासणी वा उपचार यासाठी खर्च करण्याची आर्थिक क्षमता नसते. महात्मा फुले जीवनदायी योजना, राजीव गांधी योजना, इंडियन कॅन्सर सोसायटी या सारख्या संस्था पाठीशी आहेत म्हणून आजपर्यंत आम्ही हजारो, लाखो कॅन्सर रुग्णांवर उपचार करू शकालो. ध्येय चांगले असले की चांगली माणसे एकत्र येतात. कॅन्सरच्या नवीन रुग्णांवर 'डॉ. अरुण कुरकरे फंडा'च्या माध्यमातून प्राथमिक तपासणी व प्रथमोपचार करण्यासाठी या ट्रस्टने रुग्णालयाला मान्यता दिली आहे हे आमचे सौभाग्य आहे.'' असे मनोगत डॉ. सुवर्णा पाटील यांनी व्यक्त केले.




*डॉ. श्रीपाद बाणावली आपले विचार व्यक्त करताना*

डॉ. श्रीपाद बाणावली आपल्या भाषणात म्हणाले, ''या कॅन्सर तपासणी, उपचार व मार्गदर्शन केंद्रासाठी योगदान कोणी दिले हा मुद्दा महत्त्वाचा नसून मुंबईला येऊन कॅन्सर उपचार घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे ती सोय इथे झाली हे महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात कॅन्सरवर उपचार करणे अतिशय कठीण असते. यासाठी उच्चप्रतीची सेवा देण्यासाठी फार मोठ्या इन्फ्रास्ट्रक्चरची आवश्यकता असते. ती या ठिकाणी उपलब्ध आहे. त्यामुळे निदानापासून उपचारापर्यंतचे काम लवकर होते. कॅन्सरची ट्रिटमेंट अतिशय महाग तर आहेच पण ती परवडणारीही नाही. यासाठी आम्ही या हॉस्पिटलमध्ये प्रयोग करून मेट्रोनॉमिक ही अतिशय स्वस्त औषधेपचार पद्धती शोधली. त्याचा योग्य तो परिणाम दिसू लागला. जास्त महाग औषधेच उपयोगी पडतात असे नाही तर आम्ही शोधलेली स्वस्त अशी मेट्रोनॉमिक औषध पद्धतीही सर्वत्र मान्य झाली आहे. टाटा रुग्णालयातही ही औषध पद्धती वापरली जाते. पूर्वीपासून 'इंडियन कॅन्सर सोसायटी' या संस्थेशी आम्ही निगडीत होतोच. आज 'डॉ. अरूण कुरकरे कॅन्सर फंडा'च्या माध्यमातून हे नाते अधिक दृढ झाले आहे.''




*डॉ. अरुण कुरकरे फंड ट्रस्ट'च्या अध्यक्षा डॉ. पूर्णा कुरकरे*

यानंतर 'डॉ. अरुण कुरकरे फंड ट्रस्ट'च्या अध्यक्षा डॉ. पूर्णा कुरकरे यांनी त्यांच्या ट्रस्टची संपूर्ण माहिती सांगून, ''हे रुग्णालय, मेडिकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आदी पाहून समाधान झाले. एका चांगले काम करणाऱ्या संस्थेशी आम्ही फंडाच्या माध्यमातून जोडले गेलो आहोत याचा आनंद झाला. इंडियन कॅन्सर सोसायटीशी संलग्न असलेल्या भारतातील १७ हॉस्पिटलपैकी आसाम येथील 'चिह्लर हॉस्पिटल' व 'भ.क.ल.वालावलकर रुग्णालय', डेरवण या ठिकाणी येणाऱ्या नवीन कॅन्सर रुग्णांच्या तपासणी व प्रथमोपचारासाठी आणि बऱ्या होणाऱ्या कॅन्सरसाठी हा फंड मदत करीत आहे याचा आनंद वाटतो.'' असे विचार व्यक्त केले.




*इंडियन कॅन्सर सोसायटीच्या सल्लागार उषा थोरात*

इंडियन कॅन्सर सोसायटीशी जोडल्या गेलेल्या आणि आता या संस्थेत कार्यरत असलेल्या श्रीम. उषा थोरात यांनी या फंडाची व्याप्ती सांगून येथील कामाचे कौतुक केले. ''एका अतिशय लहान खेडेगांवात एवढे मोठे काम उभे राहिले आहे ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. या फंडाच्या कामात व इंडियन कॅन्सर सोसायटीच्या कामात आम्हाला डॉ. बाणावली यांचे अतिशय मोलाचे सहकार्य मिळते.'' असे आपल्या मनोगतात उषा थोरात यांनी सांगितले.

यानंतर कॅन्सर रूग्णांनी त्याना मिळालेल्या उपचाराबाबत व मदतीबाबत आपले मनोगत व्यक्त करून येथे मिळालेल्या उपचाराची, डॉ. बाणावलींसह इतर डॉक्टरांनी केलेल्या सहकार्याची प्रशंसा करून, 'आम्हाला कॅन्सर असूनही आम्ही आमची हिम्मत न हारता या ठिकाणी असलेल्या सर्वांच्या मदतीने न घाबरता आमचे पुढील जीवन अतिशय आनंदाने व्यतीत करीत आहोत' असे सांगितले.

# विदेशी भाषा अभ्यास- अ डोअर-वे टू द ग्लोबल विलेज !

जागतिकीकरणाच्या आधुनिक युगातील नवीन पिढी 'बहुभाषिक' असणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. परदेशी भाषेत संवाद करण्यास सक्षम असण्यामुळे लोकांशी सांस्कृतिक मैत्री जोडता येते आणि आपली मूळभाषाही चांगल्या प्रकारे समजते. वैयक्तिक, शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक आणि आर्थिक संपन्नता हे परदेशी भाषा शिकण्याचे फायदे आहेत.



*शरयू यशवंतराव डॉ. बाळ फोंडके यांचे स्वागत करताना, सोबत डॉ. कृपा कुलकर्णी (स्पॅनिश टिचर) आणि मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर*

अत्यंत लहान वयातच मुलांना स्वत:च्या 'बागेपलीकडे' एक सुंदर, समृद्ध, विस्तीर्ण जग आहे हे दिसले पाहिजे. एक नवीन भाषा शिकणे म्हणजे मुलांना त्यांची क्षितिजे विस्तारण्याची उत्तम संधी देणे, त्यांच्या आयुष्याला एक नवा दृष्टिकोन प्राप्त करून देणे होय. विद्यार्थ्यांमध्ये विविध भाषांविषयी आवड निर्माण व्हावी, देशाविषयी आपुलकी निर्माण होऊन 'वसुधैव कुटुंबकम्' ही भावना वृद्धींगत व्हावी, आपले भविष्य समृद्ध करण्यासाठी विविध देशांमध्ये कारकीर्द



*डॉ. बाळ फोंडके यांचे अध्यक्षीय भाषण*

घडवणे सुलभ जावे यासाठी डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इ. ५ वी पासून जर्मन व स्पॅनिश भाषा शाळेतच विद्यार्थ्यांना शिकविल्या जातात. इयत्ता तिसरी व चौथीतील विद्यार्थ्यांना स्पॅनिशची तोंड ओळख होण्यासाठी 'Budding Spanish' चे वर्ग घेतले जातात.




*विद्यार्थ्यांकडून स्पॅनिश गीतांवर नृत्ये*

स्पॅनिश शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याला एक व्यासपीठ देण्यासाठी दरवर्षी शाळेत 'स्पॅनिश डे' साजरा केला जातो. नुकत्याच संपन्न झालेल्या ह्या कार्यक्रमाला ज्येष्ठ शास्त्रज्ञ व विज्ञान कथाकार डॉ. बाळ फोंडके हे प्रमुख पाहुणे लाभले. शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ, मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व स्पॅनिश भाषा वर्ग सुरू करण्यामागची शाळेची भूमिका व विविध स्पॅनिश उपक्रम विशद केले. प्रमुख पाहुणे डॉ. बाळ फोंडके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विज्ञानाची कास धरण्याचा बहुमोल संदेश दिला. विद्यार्थ्यांनी कोणत्याही घटनेकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघावे हे प्रात्यक्षिकाद्वारे स्पष्ट केले.

प्राथमिक ते उच्च माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांनी स्पॅनिश भाषेतून विविध कलाकृती सादर केल्या. इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी स्पॅनिश भाषेतील कविता नृत्यांद्वारे सादर केल्या. पहिल्या भारतीय स्त्री-डॉक्टर, शास्त्रज्ञ, पायलट, पोलिस ऑफिसर व गिर्यारोहक यांची मनोगते तसेच 'टोपीवाला व माकडे' ही गोष्ट स्पॅनिशमधून विद्यार्थ्यांनी सादर केली. श्रीसहजानंदसरस्वती महाराज व त्यांचे निस्सीम भक्त कमलाकरपंत वालावलकरसाहेब यांच्यातील गुरू-शिष्याचे अतूट नाते दर्शविणारा प्रसंग विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे स्पॅनिश भाषेत सादर केला. स्पॅनिश गीतांवर नृत्ये सादर करण्यात आली. आपल्या सगळ्यांनाच भावणारे 'गोरी गोरी पान' या मराठी

गाण्याचे स्पॅनिश भाषांतर सुरेल चालीत सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची वाहवा मिळवली. विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आयुषी शहा व श्रद्धा पराडकर यांनी स्पॅनिश भाषा शिक्षणातील स्वानुभव व व्यावसायिक संधी आपल्या संवादातून विशद केल्या. या सर्व कार्यक्रमांना उपस्थित प्रेक्षकवर्गाने भरभरून दाद दिली. वर्षभर चालणाऱ्या स्पॅनिश भाषा अभ्यासाच्या उपक्रमांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे प्रदान करून गौरविण्यात आले.

शाळेच्या स्पॅनिश भाषा शिक्षिका डॉ. कृपा कुलकर्णी, मुख्याध्यापिका श्रीम. प्रज्ञा पारकर, श्रीम. उज्वला जुन्नरकर व सर्व शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी राजसी माने, तनिष्का उपरे, दिक्षा तेटांबे व प्रियल निमुणकर यांनी केले. या कार्यक्रमांत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, संस्थेतील अनेक मान्यवर, पालक, शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



*वैज्ञानिक दृष्टिकोन – प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन*

# डेरवणमध्ये दि. १७ मार्चपासून भव्य क्रीडामहोत्सव

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या वतीने सलग पाचव्या वर्षी डेरवण येथे दि. १७ मार्च ते २३ मार्च २०१९ दरम्यान शिवजयंतीनिमित्त 'डेरवण यूथ गेम्स २०१९' चे आयोजन करण्यात आले आहे.

चिपळूणजवळील डेरवणमधील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट – 'एसव्हीजेसीटी'च्या भव्य क्रीडासंकुलात १५ खेळांच्या अटीतटीच्या लढतींसाठी जय्यत तयारी सुरू झाली आहे. या क्रीडा महोत्सवात ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, टेबल– टेनिस, जलतरण, तिरंदाजी, नेमबाजी, बुद्धिबळ, कॅरम तसेच देशी खेळांना प्रोत्साहन देण्याकरिता लंगडी, खो–खो, कबड्डी या वैयक्तिक खेळांसह बास्केटबॉल, फुटबॉल, व्हॉलीबॉल या खेळांचा समावेश आहे. ऑलिम्पिकमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या 'वॉल क्लाईम्बिंग' या साहसी खेळाची स्पर्धा यंदाही पाहण्यास मिळणार आहे.

भारतीय खेळ आणि ऑलिम्पिक खेळांचा संगम असणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील चार हजारपेक्षा अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. यंदाही विजेत्यांना पदके, चषक तसेच एकूण १२ लाख रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार आहे. या स्पर्धेत विजयी खेळाडूंना ६२० पदके, ३६ करंडक बक्षिस रूपाने देण्यात येणार आहे. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पदकविजेत्या खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेण्याचे निश्चित केले आहे. कोकणवासीयांना या स्पर्धेनिमित्त १८२ विविध क्रीडा प्रकारात राज्यभरातील उत्कृष्ट खेळाडूंचा चित्तथरारक खेळ पाहण्याची पर्वणी लाभणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन दि. १७ मार्च २०१९ रोजी, टेबल–टेनिस खेळातील राष्ट्रकुल तसेच आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या वरिष्ठ खेळाडू पूजा सहस्रबुद्धे यांच्या शुभहस्ते, वरिष्ठ बॅडमिंटन खेळाडू कांचन साने आणि माणिक परांजपे यांच्या उपस्थितीत शानदार समारंभाने होईल. स्पर्धेच्या काळात 'क्रीडाक्षेत्रातील रोजगाराच्या संधी', 'डोपिंग–शाप की वरदान', तसेच 'ऑलिम्पिक' आदी विषयांवर प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. स्पर्धेच्या प्रत्येक दिवशी संध्याकाळी क्रीडामानसतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ तसेच प्रशिक्षक आणि राष्ट्रीय खेळाडू यांचा मार्गदर्शन व मुलाखतींचा कार्यक्रमही रंगणार आहे.

स्पर्धेत १८ वर्षाखालील खेळाडू सहभागी होणार आहेत. दि. १४ मार्च २०१९ पर्यंत प्रवेश नोंदणी सुरू राहणार असून ऑनलाईन नोंदणी www.svjctsportsacademy.com या संकेतस्थळावर सुरू झाली आहे.

स्पर्धेचा समारोप समारंभ शिवजयंतीच्या दिवशी दि. २३ मार्चला आदिल सुमारीवाला यांच्या उपस्थितीत होईल. श्री. सुमारीवाला 'भारतीय ॲथलेटिक्स असोसिएशन'चे अध्यक्ष आहेत. त्यांनी १९८० मध्ये मॉस्को ऑलिम्पिक्समध्ये १०० मीटर धावणे क्रीडा प्रकारात भारताचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. शिवाय ते आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स असोसिएशन फेडरेशनचे प्रतिनिधी आहेत.

# डेरवण शिवसमर्थ गडात दासनवमी सोहळा उत्साहात संपन्न

श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर ट्रस्ट डेरवण येथील समाधी मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही डेरवण परिसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी समर्थ रामदासांच्या दासबोध, मनाचे श्लोक, विविध अष्टके, वरयाचना, रामरक्षा, मारूती स्तोत्र, वंदनाष्टक, आरत्या इ. संस्कारमय साहित्याच्या पाठांतराची स्पर्धा आयोजित करून 'दासनवमीचे' औचित्य साधून सदर स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. ही पाठांतर स्पर्धा गेली अनेक वर्षे संपन्न होत असून विद्यार्थी प्रतिसादही उत्तम लाभतो आहे.



*प्रमुख पाहुण्या सौ. सुनंदा शाळिग्राम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन*

या कार्यक्रमाला पुणे येथील दासबोधाच्या सखोल अभ्यासक सौ. सुनंदा शाळिग्राम प्रमुख पाहुण्या लाभल्या. मंदिरातील वेदपाठशाळेतील विद्यार्थ्यांनी शांतीसूक्त म्हणून वातावरण मंगलमय केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व समर्थ रामदासांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. श्रीम. स्नेहल रहाटे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. माजी केंद्रप्रमुख श्री. दिपक शिरोडकर यांनी प्रास्ताविक भाषण केले.

'चंदनाचे परिमळ आम्हा काय त्याचे।' हा समर्थांचा अभंग तसेच 'अवचिता गुण जाती' व 'आत्मविश्वासाचे फळ' या बोधपर गोष्टी डेरवण इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केल्या. समर्थांचे प्रिय शिष्य कल्याणस्वामींची कथा सौ. अश्विनी लिमये यांनी सांगितली. पाठांतर स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी पाठांतराचे नमुने सादर केले व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुण्या सौ. सुनंदा शाळिग्राम यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'समर्थ रामदासांनी ईश्वर दर्शन हेच एक ध्येय ठेवून आपला देह झिजवला आणि देवाच्या साक्षात्कारानंतर मात्र त्यांनी आपला देह समाजासाठी झिजवला आहे. ते थोर विचारवंत होते, श्रेष्ठ संत होते. त्यांचा ग्रंथराज 'दासबोध' हा सर्वांनी जरूर वाचावा. अध्यात्म ज्ञानाचे ते अलौकिक भांडार आहे. सदाचार, लोकसंग्रह, निष्काम जनसेवा याबाबतीत त्यांनी स्वत:च्या आचरणातून सर्वांना मौलिक मानसिक मार्गदर्शन केले आहे. त्यांचे विचार आजही आपल्याला प्रभावी वाटतात. समर्थांनी मनाच्या श्लोकातून माणसाचे अंतरंग सुधारण्याचे काम केले आहे, मनाला वळण लावण्याचे मार्ग दाखविले आहेत. लहानपणापासूनच मुलांना मनाची शिकवण दिली पाहिजे. एकदा मन अंकित करता आले तर माणूस काहीही साध्य करू शकतो. मनुष्य 'देवत्व' मिळवण्याची किमया करू शकतो.'



*प्रमुख पाहुण्या सौ. सुनंदा शाळिग्राम आपले विचार व्यक्त करताना*

या कार्यक्रमाला डेरवणच्या सरपंच सौ. स्नेहा कदम, ग्रामस्थ, शिक्षक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.अश्विनी खांडेकर यांनी केले तर श्री. कोलते यांनी सर्वांचे आभार मानले.




*पाठांतर स्पर्धेतील सहभागी*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळावरील हल्ल्याचे विद्यार्थ्यांकडून जोषपूर्ण स्वागत

बुधवार, दि. २७ फेब्रुवारीच्या पहाटे भारतीय हवाई दलाने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळांवर हल्ले चढवून ते नष्ट केले. डेरवणच्या श्रीविठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सकाळीच सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून या हल्ल्याविषयी शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी माहिती दिली. आपल्या सेनादलाच्या या धाडसी आणि यशस्वी हल्ल्यात तीनशेच्यावर अतिरेक्यांना ठार करण्यात आले आणि आपले हवाईदलाचे सर्व वीर वैमानिक सुखरूप परत आले हे वृत्त ऐकताच 'भारत माता की जय!' 'वंदे मातरम्!' अशा गगनभेदी घोषणा देऊन सर्व मुलांनी आपला आनंद व्यक्त केला. वारंवार टाळ्या वाजवून आणि घोषणा देऊन उत्फुल्ल चेहऱ्याने मुले आपला आनंद व्यक्त करीत होती.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून मार्च २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०४ मार्च | डॉ. सतेज सबनिस, युरॉलॉजिस्ट, मुंबई | मूत्रमार्गातील मुतखड्यावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया |
| ०९ मार्च | (युरोलॉजीस्ट) युरोसर्जन किडनी स्टोन | मूत्रमार्गातील मुतखड्यावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया |
| १० मार्च | डॉ. आनंद जोशी (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट), मुंबई | पचनसंस्थेवरील तपासणी व उपचार |
| १० मार्च | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन) | भाजलेले व्रण, डाग- शस्त्रक्रिया व उपचार |
| १६ मार्च | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १६ मार्च | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १६ मार्च | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक)<br>सकाळी १०.०० ते १.०० वालावलकर रुग्णालयात.<br>सायंकाळी ५.०० ते ८.०० UHTC चिपळूण येथे | त्वचारोग तज्ज्ञ |
| १७ मार्च | नेफ्रॉलॉजीस्ट, लहान मुलांचे किडनी तज्ज्ञ | लहान मुलांचे किडनी आजार व उपचार |
| ३० मार्च | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| ३१ मार्च | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| ३१ मार्च | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |
| -- | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाचे उपचार |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या शनिवारी वाचा-उच्चार तज्ज्ञ डॉ. विशाखा या वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर